




संगमनेर । अकोले । कोपरगाव । राहाता । श्रीरामपूर । राहुरी । नेवासा । शेवगाव येथून एकाच वेळी प्रसिध्द..

बांधिलकी जनहिताची

# नायक

सायं.दैनिक

संपादक : गोरक्षनाथ मदने    कार्यकारी संपादक : श्याम तिवारी








Sangamner ▮ MAHMAR/2018/75654 ▮ SRP/135/2022-2024 ▮ वर्ष ७ ▮ अंक ३१९ ▮ २४/४/२०२५ (दैनिक) ▮ किंमत रु.२/- ▮ पाने ४










# नऊ महिन्यानंतर 'लव्ह जिहाद'चा सूत्रधार सुटला!

## तालुक्याच्या पठारभागातील प्रकरण; युसुफ चौघुलेला 'सुप्रीम'कडून जामिन

**नायक वृत्तसेवा, संगमनेर**

संगमनेर तालुक्याच्या पठारभागातील १९ वर्षीय विद्यार्थीनीचे बळजबरीने अपहरण, मुंबईत नेवून धर्मांतरण करुन निकाह आणि अत्याचार प्रकरणी गेल्या नऊ महिन्यांपासून कारागृहात असलेल्या या प्रकरणाच्या सूत्रधाराला अखेर सर्वोच्च न्यायालयाने जामिन मंजूर केला आहे. गेल्यावर्षी ७ जुलैरोजी घडलेल्या या घटनेचा गुन्हा २७ जुलैरोजी दाखल होताच घारगाव पोलिसांनी मुख्य



सूत्रधार युसुफ दादा चौघुले याला श्रीरामपुरातून अटक केली होती. तर, उर्वरीत दोघा ज्ञात आरोपींसह पाचजण पसार झाले होते. अटक सूत्रधाराच्या चौकशीतून सर्व आरोपींची नावे निष्पन्न झाल्यानंतर पोलिसांनी मुंबई, गुजरातसह अनेक ठिकाणी छापे घातले. त्यातून आणखी दोघांना अटक झाली. मात्र गेल्यावर्षीच त्या दोघांचीही जामिनावर सुटका झाली. मात्र या प्रकरणाचा 'मास्टरमाईंड' युसुफ चौघुले याला कोठूनही दिलासा मिळाला नव्हता. (पान ३ वर)

▪ अवघ्या १५ वर्षाच्या अल्पवयीन मुलीस जाळ्यात ओढून शेवटी चार वर्षांनी तिचे बळजबरी अपहरण, धर्मांतरण, निकाह व अत्याचार करणारा शादाब रशीद तांबोळी, त्याला मदत करणारे पठारावरील आयाज अझीम पठाण व कुणाल विठ्ठल शिरोळे हे तिघेही अद्याप पोलिसांच्या हाती लागलेले नाहीत. यातील शादाब आणि आयाज या दोघांचा पोलिसांनी कसून माग काढला होता, त्यासाठी घारगाव पोलिसांनी ओडिशापर्यंत मजल मारली. मात्र त्या उपरांतही त्यांचे हात रिकामेच राहीले. आता तांत्रिक विश्लेषणावरुन दोघेही नेपाळमध्ये असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात येत आहे.

# पहलगाम हल्ल्याचा संगमनेरात निषेध!

## पाकिस्तानी झेंडा जाळून केला संताप व्यक्त



**नायक वृत्तसेवा, संगमनेर**

देशाचे नंदनवन समजल्या जाणाऱ्या जम्मू-काश्मीरमधील पहलगाम मध्ये अतिरेक्यांनी केलेल्या भ्याड हल्ल्यात २७ निरपराध पर्यटकांचा मृत्यू झाला. या घटनेचे पडसाद देशभर उमटत असतानाच संगमनेरात महायुतीच्या कार्यकर्त्यांनी (पान ३ वर)

▪ काश्मीर खोऱ्यातील पहलगाम येथे भारतीय नागरिकांवर झालेला भ्याड हल्ला हा अत्यंत निंदनीय व मानवतेला काळीमा फासणारा असल्याची भावना काँग्रेसचे ज्येष्ठ नेते तथा माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी व्यक्त केली.बाळासाहेब थोरात म्हणाले की, पहलगाम येथे झालेला हल्ला हा अत्यंत भ्याड व निंदनीय आहे. यामध्ये निष्पाप २७ भारतीयांचा अतिरेक्यांनी जीव घेतला आहे. ही घटना मानवतेला काळीमा फासणारी आहे. याबाबत सरकारने ठोस उपाय योजना केल्या पाहिजे.

▪ जम्मू काश्मीरमधील पहलगाम येथे पर्यटनासाठी गेलेल्या पर्यटकांना दहशतवाद्यांनी धर्म विचारून गोळीबार केला. या भ्याड हल्ल्याचा मी तीव्र शब्दात निषेध व्यक्त करतो आणि या हल्ल्यात ठार झालेल्या हिंदू बांधवांप्रती संवेदना व्यक्त करतो. हिंदू म्हणून हल्ला करणाऱ्या हल्लेखोरांना केंद्र सरकारने चांगलाच धडा शिकवावा असे आमदार अमोल खताळ यांनी या घटनेचा निषेध व्यक्त करतांना सांगितले.

# कारखान्यावर सभासद व जनतेचा मोठा विश्वास : माजी मंत्री थोरात

**नायक वृत्तसेवा, संगमनेर**

राजकारण हे नेहमी समाजाच्या विकासासाठी करायचे असते. हे तत्व घेऊन आपण सर्वांना सोबत घेऊन सातत्याने काम केले. संगमनेर तालुक्यातील समृद्धी, झालेली विकास कामे, निळवंडे धरण, कालव्यांची कामे यामागे सततचे कष्ट आहेत.त्यातून हे उभे राहिले आहे. सहकाराबरोबर तालुक्यातील विकास कायम ठेवायचा असून चांगल्या कारभारामुळे थोरात कारखान्यावर सभासद, शेतकरी व तालुक्यातील (पान ३ वर)



▪ काश्मीर खोऱ्यातील पहलगाम येथे अतिरेकी हल्ल्यात २७ निष्पाप नागरिकांना आपला जीव गमवावा लागला. या सर्व भारतीयांना यावेळी श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. याचबरोबर हा भ्याड हल्ला अत्यंत निंदनीय व माणुसकीला काळीमा फासणारा असल्याचे माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी म्हटले असून या हल्ल्याचा त्यांनी तीव्र शब्दात निषेध केला.

# पशुधन विकास अधिकाऱ्यावर पंचायत समितीत हल्ला!

**नायक वृत्तसेवा, शेवगाव**

पशुधन विकास अधिकारी ज्ञानेश्वर सर्जेराव जाधव यांच्यावर पंचायत समिती कार्यालयात जीवघेणा हल्ला झाल्याची घटना घडली आहे. यामुळे जिल्ह्यात एकच खळबळ उडाली आहे.

या घटनेतील फिर्यादी सरकारी लोकसेवक ज्ञानेश्वर सर्जेराव जाधव (वय ४५, धंदा पशुधन विकास अधिकारी पंचायत समिती शेवगाव, गणेश नगर, शेवगांव) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अनिस सय्यद (रा.नाईकवाडी मोहल्ला, शेवगाव पुर्ण नाव माहिती नाही) आणि अनोळखी दोन व्यक्ती यांच्या विरोधात सरकारी कामात अडथळा, जबरी चोरी आणि जबर मारहाणीचा गुन्हा मंगळवार दि. २२ एप्रिल रोजी रात्री उशिरा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादीत म्हटले आहे की, रविवार दि.२० एप्रिल रोजी फिर्यादी डॉ. जाधव पंचायत समिती आवारातील दत्त मंदिरात दर्शन घेवुन मंदिरापासून ऑफिसकडे जात असतांना अनिस सय्यद हा जवळ येवून म्हणाला की, मला प्रोटक्सन (पान ३ वर)

# संतप्त वातावरणातही गोवंशाची कत्तल सुरुच!

## संगमनेरातील रक्ताचे पाट थांबेना; पोलिसांचा धाकच राहीला नाही

**नायक वृत्तसेवा, संगमनेर**

काश्मिर खोऱ्यातील पहेलगामम ध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यात २८ निष्पाप पर्यटकांचे बळी गेल्याच्या घटनेने अवघा देश संताप व्यक्त करीत असताना संगमनेरातील कसाई मात्र आपल्या बेकायदा उद्योगातच मश्गुल असल्याचे धक्कादायक चित्र पुन्हा एकदा समोर आले आहे. मंगळवारी दुपारी खोऱ्यात घडलेल्या या घटनेनंतर संगमनेरातही त्याच्या तीव्र प्रतिक्रिया उमटत असतानाच आज पहाटे पाचच्या सुमारास शहर पोलिसांच्या पथकाने भारतनगरमधील कादरी मशिद परिसरात घातलेल्या छाप्यात तब्बल सव्वाटन गोवंशाचे मांस हस्तगत झाले आहे. या कारवाईत पोलिसांनी नेहमीप्रमाणे 'पंटर'वर गुन्हा दाखल केला (पान ३ वर)

▪ २०१४ साली राज्यात महायुतीचे सरकार आल्यानंतर गोहत्या बंदी कायद्यात सुधारणा करुन त्याची व्याप्ती गोवंश करण्यात आली. मात्र अपवाद वगळता गेल्या दहा वर्षांपासून सत्तेत असलेल्या महायुतीला राज्यातील आणि विशेष करुन संगमनेरातील गोवंश कत्तलखाने समूळ बंद करता आलेले नाहीत. त्यातच यावेळी राज्यातील मतदारांनी महायुतीला ऐतिहासिक बहुमत देतानाच संगमनेरातही परिवर्तन घडवल्याने यानंतर तरी आता शहराला कलंकित करणाऱ्या या गोष्टी पूर्णतः थांबतील असे अपेक्षित होते. मात्र या सर्व अपेक्षांना घाटावर सोडून येथील कसायांनी आपले उद्योग कायम ठेवले असून आजही दररोज शेकडों गोवंशाची कत्तल होवून त्यांच्या रक्ताचे पाट वाहतेच असल्याने शहरातून मोठा संताप व्यक्त होत आहे.

















# संपादकीय

सुविचार : सत्य कोणत्याही कसोटीला घाबरत नाही.

## पहलगाममधील आक्रित

जम्मू-काश्मीरमधील पहलगाममधील दहशतवादी हल्ल्यामध्ये २७ जणांचा अतिशय दुर्दैवी मृत्यू झाला आहे. या अत्यंत नृशंस आणि अमानुष हल्ल्याने अनेक प्रश्नांचे मोहोळ उठले आहे. पहलगाममध्ये हल्ला करणाऱ्या दहशतवाद्यांनी रेकी केल्यानंतर ही घटना घडवून आणली असल्याची माहिती उघड झाली आहे. या दहशतवाद्यांनी कोणाला शंका येऊ नये म्हणून स्थानिक भाषेत संवाद साधला होता. पोलिसांच्या वेशातल्या स्थानिकांनी दहशतवाद्यांना मदत केल्याची माहितीही समोर आली आहे. लोकांनी लष्करी गणवेश घातलेल्या दहशतवाद्यांना लष्करी जवान समजले. म्हणूनच दहशतवादी इतक्या मोठ्या प्रमाणात लोकांना लक्ष्य करू शकले. फेब्रुवारी २०१९ मध्ये पुलवामा हल्ल्यानंतरचा जम्मू आणि काश्मीरमधील हा सर्वात मोठा दहशतवादी हल्ला आहे. त्या हल्ल्यात ४७ सीआरपीएफ जवान शहीद झाले होते. या हल्ल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी सौदी अरेबियाचा दौरा अर्धवट सोडून परतले आहेत. बैसरन खोऱ्यात झालेल्या या हल्ल्याने संपूर्ण देश हादरला आहे. या हल्ल्याची जबाबदारी टीआरएफ म्हणजेच 'द रेझिस्टन्स फ्रंट' ने घेतली असून ती पाकिस्तानस्थित दहशतवादी संघटना लष्कर-ए-तैयबाची एक आघाडी आहे. जम्मू आणि काश्मीरमधील लष्कर आणि टीआरएफच्या दहशतवादी कारवायांमागे दहशतवादी सैफुल्ला खालिदचे डोके असल्याचे उघड झाले आहे. तो या हल्ल्यांचा सूत्रधार असल्याचे म्हटले जात आहे. लष्कर-ए-तैयबाचा उपप्रमुख सैफुल्ला खालिद हा सैफुल्ला कसुरी या नावानेही ओळखला जातो. तो भारताचा सर्वात मोठा शत्रू हाफिज सईदच्या खूप जवळचा आहे. भारतातील अनेक मोठ्या दहशतवादी हल्ल्यांमध्ये त्याचे नाव घेतले गेले आहे. लष्करचे दहशतवादी नेहमीच त्याच्या संरक्षणासाठी अत्याधुनिक शस्त्रांनी सज्ज असतात. पाकिस्तानमधील त्याचा प्रभाव एवढा आहे की त्याठिकाणचे लष्करी अधिकारीही त्याच्यावर पुष्पवृष्टी करतात. तो पाकिस्तानी सैन्याच्या सैनिकांना भडकवण्याचे काम करते. या दहशतवादी हल्ल्याच्या फक्त दोन महिने आधी, सैफुल्ला खालिद पाकिस्तानातील पंजाबमधील कंगनपूर याठिकाणी पोहोचला होता. तिथे पाकिस्तानी सैन्याची एक मोठी बटालियन आहे. तिथे पाकिस्तानी सैन्याचे कर्नल जाहिद जरीन खट्टक यांनी त्यांना जिहादी भाषण देण्यासाठी आमंत्रित केले होते. तो त्याठिकाणी पोहोचल्यानंतर कर्नलने स्वतः त्याच्यावर फुले उधळली. यानंतर, त्यांनी पाकिस्तानी सैन्याला भारताविरुद्ध जोरदार चिथावणी दिली. त्याने असेही म्हटले की जितके जास्त भारतीय सैनिक ते मारतील तितके जास्त अल्लाह त्यांना बक्षीस देईल. पाकिस्तानातील खैबर पख्तूनख्वा याठिकाणी झालेल्या बैठकीत त्याने भारताविरुद्ध विष ओकले होते. त्यावर लिहिले होते, मी वचन देतो की आज २ फेब्रुवारी २०२५ आहे. २ फेब्रुवारी २०२६ पर्यंत आम्ही काश्मीर काबीज करण्याचा पूर्ण प्रयत्न करू. येणाऱ्या काळात आमचे मुजाहिद्दीन त्यांचे हल्ले तीव्र करतील. ही बैठक आयएसआय आणि पाकिस्तानी लष्कराने संयुक्तपणे आयोजित केली होती. त्याचे ऐकण्यासाठी मोठ्या संख्येने सशस्त्र दहशतवादी जमले होते. जम्मू आणि काश्मीरमधून कलम ३७० आणि ३५ अ रद्द करण्यात आले. यानंतर आयएसआयने पाकिस्तानस्थित दहशतवादी संघटना लष्कर-ए-तैयबा आणि जैश-ए-मोहम्मद यांना कव्हर करण्यासाठी टीआरएफ म्हणजेच 'द रेझिस्टन्स फ्रंट' ची स्थापना केली. पाकिस्तानी सैन्य या दहशतवादी संघटनेला मदत करते. लष्कराच्या निधीच्या माध्यमांचा वापर केला जातो. टीआरएफचे 'हिट स्क्वॉड' आणि 'फाल्कन स्क्वॉड' येत्या काळात काश्मीरमध्ये मोठे आव्हान निर्माण करू शकतात. या दहशतवादी मॉड्यूलला टार्गेटेड किलिंग करण्याचे आणि जंगलात आणि उंच भागात लपण्याचे प्रशिक्षण देण्यात आले आहे. त्यामुळे सुरक्षा यंत्रणांपुढे मोठे आव्हान निर्माण झाले आहे. पहलगामला लक्ष्य बनवण्यामागे एक मोठे कारण म्हणजे अमरनाथ यात्रेसाठी दोन मार्ग असून त्यातील एक मार्ग पहलगाममार्गे जातो. त्यामुळे या भागात दहशतवादी हल्ला करून अमरनाथला जाणाऱ्या यात्रेकरूंच्या मनात भीती निर्माण करण्याचा प्रयत्न करण्याचा दहशतवाद्यांचा डावा होता. जम्मू-काश्मीरमध्ये गेल्या काही काळात दहशतवादी संघटनांच्या हल्ल्यांमध्ये आणि त्यांच्या हालचालींमध्ये जी वाढ झाली आहे, ती पुन्हा एकदा अधिक गुंतागुंतीचे स्वरूप धारण करत आहे का, असा प्रश्न उपस्थित होत आहे. त्यांच्या हल्ल्यांच्या पद्धतीमध्ये जे बदल झाले आहेत, ते या समस्येला अधिक गंभीर बनवत आहेत.यामागची मनोवृत्ती स्पष्ट आहेज्जम्मू-काश्मीरमध्ये पर्यटन वा अन्य कारणांनी येणाऱ्या लोकांमध्ये भीती निर्माण करणे. देश-विदेशातून येणाऱ्या पर्यटकांमध्ये जर भीती निर्माण झाली, तर त्याचा थेट परिणाम काश्मीरच्या अर्थव्यवस्थेवर होऊ शकतो. या हल्ल्यानंतर दोन प्रमुख आव्हाने आहेत. एक म्हणजे याला प्रत्युत्तर देणे आणि दुसरे म्हणजे या हल्ल्याचा संदर्भ घेत देशांतर्गत सामाजिक सलोखा बिघडणार नाही यासाठी संयमी आणि काटेकोर उपाययोजना करणे. तूर्त या भीषण हल्ल्याचा तीव्र निषेध.

# श्री. सी. टी. दिघे एक अव्यक्तिगत जीवन प्रवास

**स्व. चांगदेव तुकाराम दिघे हे माझे वडील. आम्ही सर्व भावंड त्यांना आप्पा म्हणायचो. मी आप्पांची मुलगी. परंतु आप्पांनी आम्हाला नेहमी मुलांऐवजी जिवलग मित्र मानले. त्यातून आमच्याशी गप्पा मारताना त्यांनी त्यांच्या जीवनातील अनेक गोष्टी आम्हाला सांगितल्या. त्यांच्याशी झालेली हितगुज आज आप्पांच्या स्मृती जागवताना या ठिकाणी शब्द रूपाने मांडताना आमचे अंत:करण भरून येते.**

आमचे मुळगाव कोल्हेवाडी, माझे आजोबा तुकाराम किसन दिघे आणि आजी जिजाबाई तुकाराम दिघे यांना कारभारी, चांगदेव, नामदेव आणि भागवत ही चार मुले आणि मंजुळाबाई, चहाबाई, हिराबाई, बबुबाई आणि छबूबाई या पाच मुली. भावंडांमध्ये आप्पांचा नंबर तिसरा. त्यांचे प्राथमिक शिक्षण कोल्हेवाडीच्या जिल्हा परिषद शाळेत झाले. आप्पा सातवीच्या वर्गात शिकत होते, ते साल होते १९६३. त्याच साली आमच्या आजोबांनी संगमनेर खुर्द येथे जमीन खरेदी केली आणि आमचे कुटुंब संसार साहित्य बैलगाडीत घालून संगमनेर खुर्दला स्थलांतरित झाले. संगमनेर खुर्दची जमीन खरेदी करण्यासाठी आप्पांचे आजोळ असलेल्या खांडगाव येथील सर्व मामांनी सर्वतोपरी मदत केली. त्यामुळेच आम्हाला येथे स्थिरस्थावर होण्याची संधी मिळाली असे आप्पा मामांबद्दल कृतज्ञता व्यक्त करायचे.

संगमनेर खुर्दला आल्यानंतर माध्यमिक शिक्षणासाठी आप्पांनी ज्ञानमाता विद्यालयात प्रवेश घेतला. माध्यमिक शिक्षण पूर्ण झाल्यानंतर पुढील शिक्षणासाठी संगमनेर महाविद्यालयात प्रवेश घेतला आणि १९७३ साली पदवी आणि १९७५ साली पदव्युत्तर शिक्षण पूर्ण करत एम.कॉम ही पदवी संपादन केली. दरम्यानच्या काळात दादा म्हणजे आमचे आजोबा हे बांधकाम क्षेत्रात ठेकेदारी व्यवसाय करत होते. शिक्षण सुरू असतानाच आप्पांनी दादांच्या सानिध्यात व्यवसायाचे धडे गिरवण्यास सुरुवात केली. त्यातूनच त्यांना व्यवसायात गोडी निर्माण झाली. शिक्षणानंतर बँकेत चांगल्या पदाची नोकरी मिळाली असतानाही आप्पांनी ती नाकारली आणि व्यवसाय करण्याचा निर्णय घेतला. त्यांचा हाच निर्णय आमच्या दिघे परिवाराला प्रगतीपथावर नेणारा ठरला.

आप्पा एक प्रसंग नेहमी सांगायचे. आमच्या दादांकडे एक ट्रक होता. व्यवसायाच्या वाढीसाठी त्या ट्रकवर त्यांनी खाजगी सावकाराकडून कर्ज घेतले होते. कर्जाला चक्रवाढ पद्धतीने व्याज आकारले जात असल्याने कर्ज काही फेडले जात नव्हते. त्यावरून घरात अनेकदा वाद होत असत. आप्पांनी आमच्या दादांना आणि आजींना विश्वासात घेऊन कर्जमुक्तीचा एक पर्याय दिला, जो पर्याय त्यांनी स्वीकारला आणि कर्जमुक्ती केली. आमच्या दादांनी प्रथमच घेतलेला तो ट्रक विकून त्या कर्जाची परतफेड करावी हा तो पर्याय होता हे सांगताना आप्पांचा कंठ दाटून यायचा. दादांनी केलेल्या कष्टाच्या घामातून जमवलेल्या रकमेतून तो ट्रक घेतला होता.

१९७२ चा काळ असेल आप्पा






दादांच्या व्यवसायात सहभागी झाले. व्यवसायाच्या कामानिमित्त फिरण्यासाठी त्यांच्याकडे स्वतःचे वाहन नव्हते, अशावेळी भाड्याची सायकल घेऊन ते फिरत असत. त्यांचा हा दैनंदिन प्रवास पाहून त्यांचे मित्र श्री काकडे काका यांनी आप्पांना एक सेकंड हॅन्ड मोटारसायकल घेण्याविषयी सुचवले. तेव्हा आप्पा म्हणाले माझ्याकडे मोटारसायकल घेणे इतपत पैसे नाहीत. यावर काकडे काकांनी आप्पांना एक जुनी एज डी गाडी उधारीवर घेऊन दिली. त्यापूर्वी त्यांनी काही दिवस नबाजी रभाजी गुंजाळ यांची मोटारसायकल वापरली. कर्ज फेडण्यासाठी बापाने कमावलेला ट्रक विकावा लागला या अनुभवाची शिदोरी पाठीशी असल्याने आप्पांनी स्वतःला व्यवसायात पूर्णपणे झोकून दिले. कठोर मेहनत, जिद्द, चिकाटी या त्रिसूत्रीचा अवलंब करत गुणवत्ता आणि दर्जेदार कामाच्या जोरावर व्यवसाय प्रगतीपथावर नेला. व्यवसायातून केवळ पैसा कमावणे हा उद्देश न ठेवता त्यांनी कामाचा उत्कृष्ट आणि गुणवत्तापूर्ण दर्जा राखण्यासाठी नेहमीच प्राधान्य दिले. दरम्यान १९७५ साली संगमनेर खुर्द येथील प्रतिष्ठित शिंदे घराण्यातील निवृत्ती दगडू शिंदे यांच्या कन्या सुरेखा यांच्याबरोबर त्यांचा विवाह झाला. आप्पांच्या या वाटचालीत जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर मम्मीने त्यांना उत्तम साथ दिली.

माझे सर्वात लहान चुलते काका म्हणजेच भागवतराव तुकाराम दिघे यांनी १९९२ सालापासून व्यवसायात सहभागी होत आप्पांना उत्तम साथ दिली. आप्पांनी जीवनात व्यवसाया बरोबरच सामाजिक बांधिलकी ही जपली. दादा आणि आजीपासून मिळालेला अध्यात्माचा वारसा



### प्रासंगिक

पुढे नेताना त्यांनी वारकरी संप्रदायाचे पाईक होत विधायक कार्यात वेळोवेळी मदत केली. यात प्रामुख्याने ह. भ. प. महाराज पवार यांच्या आश्रमाला देणगी देणं असो, आषाढी कार्तिकी एकादशीच्या निमित्ताने आळंदी मध्ये येणाऱ्या वारकरी भाविकांना बुंदीच्या महाप्रसादाचे वाटप करणे असो हे उपक्रम त्यांचे सालाबाद प्रमाणे सुरूच होते.

शिक्षण हे जीवन विकासाचे मुख्य साधन आहे, याची प्रचिती आल्याने आप्पांनी शिक्षणाला महत्त्व दिले. आप्पांच्या आम्ही तिघी बहिणी आणि आमचा भाऊ गणेश या सर्वांना आप्पांनी उच्च शिक्षण दिले. आज आमचा भाऊ गणेश हा आप्पाच्या पावलावर पाऊल टाकत गव्हर्मेंट कॉन्ट्रॅक्टर म्हणून आपला व्यवसाय उत्कृष्ट रीतीने करत आहे. आप्पांचे तीनही जावई उच्चशिक्षित असून त्यापैकी सुधीर खांदे हे अप्पर जिल्हाधिकारी पदावर कार्यरत आहेत. प्रा. डॉ. दिनेश कानवडे हे कृषी विद्यापीठ संशोधन विभागात कार्यरत असून तिसरे जावई संदीप राहणे हे बिल्डर व कॉन्ट्रॅक्टर हा व्यवसाय करत आहेत.

आमच्या दिघे परिवारात सुरुवातीपासूनच धार्मिक आणि अध्यात्मिक वातावरण असल्याने आप्पा देखील वारकरी संप्रदायाचे पाईक बनले. धार्मिक कार्यात ते सदैव अग्रेसर असायचे. कोल्हेवाडी या आपल्या मुळ गावी असलेल्या हनुमान मंदिराच्या जिर्णोद्धारा वेळी आप्पांनी साहित्याच्या रूपात भरीव योगदान दिले. धार्मिक कार्याबरोबरच सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रात देखील आप्पांचे योगदान मोठे होते. संगमनेर खुर्द येथील अमृतेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या उभारणीमध्ये आप्पांचा वाटा सिंहाचा होता. शाळा सुरू करण्यासाठी लागणाऱ्या जागेच्या उपलब्धतेपासून शाळेसाठी आवश्यक इमारती उभारण्यामध्ये आप्पांनी केलेले सहकार्य बहुमोल असेच आहे. या कार्याबरोबरच आपल्या व्यवसायाशी संबंधित कामगार वर्गांच्या अडीअडचणीच्या प्रसंगी त्यांना मदत करण्यासाठी ही आप्पा सदैव तत्पर असायचे. त्यांच्या उदार आणि सेवाभावी वृत्ती बद्दल बोलतांना असेही म्हणता येईल

**मातीमध्ये मळलेल्यांना अलगदपणे उचलून घेतले,**
**उपाशीपोटी मुखात त्यांच्या कष्टाने चार घास घातले.**
**उजाड झाल्या धरतीला हिरवाईचा साज दिला,**
**मागासलेल्या जगण्याला प्रगतीचा आवाज दिला.**
**मातीशी राखून इमान आदर्शांचे देणे दिले,**
**परिसासम जीवन तुमचे अनेक जीवांचे सोने केले.**

आप्पा त्यांच्या कार्याने जसे कर्तृत्ववान तसेच ते एक आदर्श पती कुटुंबवत्सल आणि प्रेमळ पिता होते याचा प्रत्यय आम्हा सर्व भावंडांना आणि कुटुंबातील सदस्यांना वेळोवेळी येत राहिला. आज आप्पा हयात नाहीत परंतु आप्पांनी केलेले कार्य आणि त्यांच्या आदर्श विचारांच्या रूपाने ते सदैव आम्हाला प्रेरणा देत राहतील. त्यांच्या प्रती आदरभाव व्यक्त करतांना आमच्या मनात भावना दाटून येतात.

**दिव्यत्वाची जेथे प्रचिती,**
**तेथे कर माझे जुळती!**

**शोकाकुल :**

**श्री. गणेश चांगदेव दिघे**
**सौ. सविता सुधीर खांदे**
**सौ. अर्चना दिनेश कानवडे**
**सौ. शारदा संदीप रहाणे**

### व्यक्तिवेध

## सर महंमद इकबाल


सारे जहाँ से अच्छा, हिंदोस्ताँ हमारा, या गीताचे कवी आणि पुढे पाकिस्तान या स्वतंत्र राष्ट्राची मागणी करणारे कवी सर महंमद इकबाल यांचा जन्म २२ फेब्रुवारी १८७३ रोजी सियालकोट येथे झाला. महंमद यांचा उर्दू व फारसीचा विशेष अभ्यास होता. तत्वज्ञान या विषयात त्यांनी विद्या वाचस्पती पदवी घेतली. होती. इंग्रजी, जर्मन, उर्दू व फारसीवर प्रभुत्व असणारे सर महंमद बॅरिस्टर, प्राध्यापक, कवी म्हणून ओळखले जातात. इकबाल हे त्यांनी कवितेसाठी घेतलेले टोपणनाव आहे. असरमें खुर्दी, रुमुजे बेखुदी या त्यांच्या फारसी खांडकाव्यांचा इंग्रजी अनुवाद प्रा. निकल्सन यांनी केला आहे. या ग्रंथामुळेच त्यांना सर हा किताब देण्यात आला. त्यांना जागतिक किर्ती लाभाली ती या दोन ग्रंथांच्या इंग्रजी आवृत्यांमुळेच. पयामे मशरिक, जावेदनामा हे फारसी तर बाले जिबैल व जबै कलीम हे उर्दू काव्यसंग्रह त्यांनी लिहिले. स्वतंत्र पाकिस्तानची मागणी इकबाल यांनी केली तरी त्यांनी भारतीयांची मने जिंकली आहेत ती, सारे जहाँ से अच्छा... या गीतामुळे. भारताचे सुरेख वर्णन करणारे हे कवी २१ एप्रिल १९३८ रोजी पैगंबरवासी झाले.

### ज्ञानकोष

## पाणघोडा

पाणघोडा अर्थातच हिप्पोपोटेमस. याला हिप्पोपोटेमस म्हणतात. यांच्या शरीराच्या वजनाच्या तुलनेत यांचे पाय लहान असतात. म्हणून यांना चालण्याचा त्रास होतो. पाण्यात हे पोहत राहतात. यांच्या शरीरात नैसर्गिक सनस्क्रीन असतं. ज्यामुळे सूर्याच्या प्रकाशापासून हे स्वत:ला वाचवतात.

हे प्राणी समुहाने राहातात. यांचा एक प्रमुख असतो आणि समूहात ४० हिप्पो एकमेकांसोबत राहतात. एका समूहाकडे नदीचा २५० मीटर क्षेत्र असते. समूहात ते मिळूनमिसळून राहतात. हिप्पो शाकाहारी असून, पाण्यातून बाहेर येऊन हे गवत खाणे पसंत करतात. हे रात्री चार ते पाच तासापर्यंत गवत चरत राहतात. या दरम्यान ते ६८ किलो गवत चरुन जातात आणि रात्रभरात पचवूनही घेतात. हाट होण्यापूर्वी पुन्हा पाण्यात चालत जातात. इतर जीवांप्रमाणे हिप्पोचा सर्वात मोठा शत्रू मनुष्य आहे. दात आणि मांसासाठी याची शिकार केली जाते. हिप्पोचे दात हत्तीच्या दाताहून अधिक महाग असतात.कारण हिप्पोचे दात कायम पांढरेच राहतात.



पान १ वरुन

**नऊ महिन्यानंतर 'लव्ह जिहाद'चा सूत्रधार सुटला!**

उच्च न्यायालयाने त्याला जामिन देण्यास नकार दिल्यानंतर चालूवर्षी फेब्रुवारीत त्याने सर्वोच्च न्यायालयात दाद मागितली. त्याला घारगाव पोलिसांकडून कडाडून विरोधही झाला. मात्र दोन्ही बाजूच्या युक्तिवादानंतर सर्वोच्च न्यायालयाने त्याला सशर्त जामिन मंजूर केला असून नऊ महिन्यानंतर अखेर त्याची सुटका झाली आहे.

तालुक्याच्या पठारभागातील जिल्हा परिषद शाळेत शिकणाऱ्या एका १५ वर्षीय विद्यार्थीनीला आरोपी युसुफ दादा चौघुले याने घारगावमधील आरोपी शादाब रशीद तांबोळी याच्याशी प्रेमसंबंध निर्माण करण्यास भाग पाडले होते. हा प्रकार महिन्याभरातच पीडित मुलीच्या घरी समजल्याने त्यांनी दोघांचीही खरडपट्टी काढून या 'पूर्वनियोजित' प्रेमप्रकरणावर माती टाकली. वर्षभरानंतर पीडित तरुणी पुढील शिक्षणासाठी संगमनेरला येवून वसतीगृहावर राहत असताना आरोपी शादाब तांबोळीने कुणाल विठ्ठल शिरोळे याच्या मदतीने पुन्हा तिच्याशी संपर्क साधून 'मैत्रिच्या' संबंधाच्या हवाल्याने 'कॅफे हाऊस'मध्ये नेले व तेथील एकांताचा फायदा घेत तिच्याशी लगड करतानाची छायाचित्रे घेतली. त्यानंतर त्याच्याच आधाराने त्याने पीडितेला ब्लॅकमेल करुन तिच्याशी पुन्हा प्रेमसंबंध प्रस्थापित केले. मात्र वर्षभरानंतर पुढील शिक्षणासाठी पुणे जिल्ह्यात गेल्यानंतर तिने काही दिवसांतच सदरचे संबंध संपवण्याचे ठरवून शादाब तांबोळीच्या बळजोरीला 'आत्महत्ये'ची धमकी देत ते संपुष्टात आणले.

मात्र 'लव्ह जिहाद'चा किडा डोक्यात घेवून या संपूर्ण प्रकरणाचा 'कट' शिजवणाऱ्या युसुफ दादा चौगुले याला ही गोष्ट मान्य नसल्याने त्याने गेल्यावर्षी ७ जुलैरोजी शादाब तांबोळीकरवी पीडितेला फोन करुन मंचर बसस्थानकावर बोलावले. यावेळी शादाब तांबोळीसोबत युसुफ चौघुलेही आपल्या वाहनासह तेथे हजर होता. त्यावेळी गाडीत बसून बोलण्याचा बहाणा करुन त्या दोघांनी तिचे अपहरण केले. या कृत्याला पीडितेने विरोध करण्यास सुरुवात केल्याने युसुफ चौघुले याने पिण्याच्या पाण्यातून गुंगीचे औषध पाजून तिला बेशुद्ध केले. चाकणजवळ शादाबसह बेशुद्धावस्थेत असलेल्या पीडितेला दुसऱ्या वाहनातून मुंबईला नेले व तेथे आदिल शब्बीर सय्यद याच्या मदतीने त्या दोघांची सानपाड्यात मुक्कामाची आणि नंतर धर्मांतरण करुन तिच्याशी निकाह करण्याची व्यवस्थाही केली. सदरचा प्रकार उघड झाल्यानंतर तालुक्यात तणाव निर्माण झाल्याने घारगाव पोलिसांनी सूत्रधार युसुफ चौघुले याला ताब्यात घेत पीडितेसह शादाब तांबोळी याला पोलिसांसमोर शरण येण्यास भाग पाडले.

अपहरणानंतरच्या दोन दिवसांत घडलेल्या घडामोडी, लैंगिक अत्याचार, दमबाजी, धमक्या यामुळे पीडितेची प्रकृती खालावलेली असल्याने तिला रुग्णालयात दाखल करण्यात आले. तब्बल २० दिवसांनी ती त्यातून सावरली आणि तिने घारगाव पोलीस ठाण्यात जावून वरील संपूर्ण प्रकार कथन केला. त्यावरुन पोलिसांनी शादाब रशीद तांबोळी (रा. घारगाव, फरार), युसुफ दादा चौघुले (वय ३०, रा.घारगाव, सूत्रधार), कुणाल विठ्ठल शिरोळे (रा.घारगाव, फरार), आयाज अझीम पठाण (रा.कुरकुंडी, फरार), आदिल शब्बीर शेख (वय ३६, रा.घनसोली, नवी मुंबई) आणि अमर मेहबुब पटेल (वय २९, रा.साकूर) अशा सहाजणांवर गुन्हा दाखल करीत त्याच दिवशी मध्यरात्री मुख्य सूत्रधार युसुफ चौघुले याला श्रीरामपूरातून अटक केली.

त्याच्या तपासातून अन्य आरोपींची नावे निष्पन्न झाल्यानंतर पोलिसांनी छापेमारी सुरु केली. मात्र गुन्हा दाखल होताच सर्वच आरोपी पसार झाले. दरम्यानच्या काळात दोघांचा सुगावा लागल्याने गेल्यावर्षी ४ ऑगस्टरोजी यातील आदिल शेखला मुंबईतून तर, अमर पटेल याला साकूरमधून अटक झाली. महिन्याभरात या दोघांची जामिनावर सुटकाही झाली. या दोघांना जामिन मिळाल्याने युसुफ चौगुले यानेही संगमनेरच्या जिल्हा व सत्र न्यायालयात जामिनअर्ज केला, मात्र तो फेटाळण्यात आला. त्यानंतर त्याने उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजीनगर खंडपीठात धाव घेतली. मात्र तेथूनही त्याला दिलासा मिळाला नाही. त्यामुळे त्याने गेल्या फेब्रुवारीत सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली. दरम्यानच्या काळात आरोपीची बहिण हिना दादा चौघुलेने सध्या सुप्यात राहणाऱ्या पीडितेच्या आईकडे जावून आपल्या भावाच्या जामिनअर्जाला विरोध करु नये म्हणून शिवीगाळ व दमबाजीही केली. त्याबाबतचा गुन्हाही सुपा पोलीस ठाण्यात दाखल आहे.

यासर्व गोष्टींचा विचार करुन घारगावचे तत्कालीन निरीक्षक दिगंबर भदाणे यांनी सर्वोच्च न्यायालयात आपले लेखी म्हणणे सदर करताना सुनियोजित पद्धतीने आखलेल्या या षडयंत्राचा मुख्य सूत्रधार युसुफ चौगुलेच असल्याचे १८ मुद्द्यांच्या आधारे न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले. या प्रकरणात मुलीला पळवून नेणाऱ्यासह तिघे फरार असल्याचेही न्यायालयात सांगण्यात आले. बचावपक्षाने आरोपी नऊ महिन्यांपासून कारागृहात असल्याचे सांगत आता त्याला डांबून ठेवण्यातून काहीच हशील होणार नसल्याचा युक्तिवाद केला. दोन्ही बाजू ऐकून घेतल्यानंतर सर्वोच्च न्यायालयाने तब्बल नऊ महिन्यांपासून कारागृहात कैद असलेल्या संगमनेरातील पहिल्या 'लव्ह जिहाद' प्रकरणाचा 'मास्टरमाईंड' युसुफ दादा चौघुले याला जामिन मंजूर केल्याने त्याची सुटका झाली आहे.

**पहलगाम हल्ल्याचा संगमनेरात निषेध!**

बस स्थानकासमोरील जुन्या नाशिक-पुणे महामार्गावरील चौकात या हल्ल्याचा निषेध करत आंदोलन केले. यावेळी आंदोलकांनी पाकिस्तान मुर्दाबादच्या घोषणा देत पाकिस्तानी झेंडा जाळून आपला संताप व्यक्त केला.

मंगळवारी देशाचे नाक समजल्या जाणाऱ्या जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे पर्यटनासाठी गेलेल्या पर्यटकांना पोलिसांच्या वेशात असलेल्या पाकिस्तानी अतिरेक्यांनी पर्यटकांना त्यांचा धर्म विचारून एकेकाला ठार केले. या घटनेत देशातील २७ निरपराध व्यक्तींना आपला जीव गमवावा लागला. यामध्ये राज्यातील सहा जणांचा मृत्यू झाला. या घटनेचे पडसाद देशभर उमटत असताना संगमनेरात महायुतीच्या कार्यकर्त्यांनी आणि पदाधिकाऱ्यांनी बुधवारी सकाळी अकरा वाजेच्या सुमारास संगमनेर बस स्थानकाच्या समोरून जाणाऱ्या जुन्या नाशिक- पुणे राष्ट्रीय महामार्गावर रस्ता रोको आंदोलन करत पाकिस्तानच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी केली. पाकिस्तान मुर्दाबाद, हिंदू पर्यटकांवर हल्ला करणाऱ्या पाकड्यांचा जाहीर निषेध करत संताप व्यक्त केला. यावेळी पाकिस्तानी झेंड्याला आग लावून तो पेटवून देण्यात आला.

यावेळी आमदार अमोल खताळ यांच्या पत्नी निलम खताळ म्हणाल्या की, जम्मू काश्मीरमधील पहलगाम येथील पर्यटकांवर त्यांचा धर्म विचारून केलेल्या अतिरेकी हल्ल्याचा महायुतीच्या वतीने मी तीव्र शब्दात जाहीर निषेध करते आणि या अतिरेकांना केंद्र सरकारने धडा शिकवावा अशी मागणी त्यांनी केली. आपल्या बांधवांवर अतिरेक्यांनी केलेल्या हल्ल्याला प्रतिउत्तर देण्यासाठी सर्वांनी राजकारण बाजूला ठेवून पाकिस्तानला उत्तर देण्यासाठी एकत्र येणे गरजेचे असल्याचे आरपीआयचे शहराध्यक्ष कैलास कासार यांनी सांगितले.हिंदू पर्यटकांवर दहशतवाद्यांनी जो हल्ला केला आहे त्या सर्व अतिरेकी संघटना खत्म करण्यासाठी केंद्र सरकारने पाऊल उचलावे अशी मागणी सकल हिंदू समाजाच्या वतीने भाजपच्या शहराध्यक्ष पायल ताजणे यांनी केली. पर्यटकांना दहशतवाद्यांनी ज्याप्रमाणे धर्म विचारून गोळीबार करत मारले, त्या दहशतवाद्यांना धडा शिकवण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शहा यांनी मागील वेळी 'वीट का जवाब, पत्थर से देंगे' या युक्ती प्रमाणे केलेल्या सर्जिकल स्ट्राइक पेक्षाही मोठा सर्जिकल स्ट्राइक करून आमच्या हिंदू पर्यटकांवर त्यांनी हल्ला केला. त्यापेक्षा ही मोठा हल्ला पाकिस्तानच्या अतिरेकी तळावर करून त्यांचे तळ उध्वस्त करावे असे भाजपचे नूतन तालुका अध्यक्ष गुलाब भोसले, श्रीकांत गोमासे यावेळी म्हणाले.

दहशतवाद्यांनी जो हल्ला केला तो हल्ला फक्त हिंदू पर्यटकांवर झालेला नाही तर संपूर्ण देशातील असंख्य हिंदूवर झालेला हल्ला आहे, त्यामुळे ज्या दहशतवाद्यांनी हिंदू पर्यटकांवर हल्ला केला तसाच 'खून का बदला, खून से देंगे' असे करून त्यांचा बदला घेतला पाहिजे असे शिवसेनेचे शहर प्रमुख विनोद सूर्यवंशी व तालुका प्रमुख रमेश काळे यांनी सांगितले.

यावेळी ज्ञानेश्वर करपे, शिवसेनेचे तालुकाप्रमुख रामभाऊ राहाणे, दिनेश फटांगरे,

पायल ताजणे,तालुकाध्यक्ष श्रीकांत गोमासे,तालुकाध्यक्ष गुलाबर भोसले,शहरप्रमुख विनोद सूर्यवंशी,दिनेश फटांगरे,दिनेश सोमाणी,राम जाजू ,राजेंद्र सांगळे,दादा गुंजाळ,साहेबराव वलवे,रोहिदास साबळे,वाल्मिक शिंदे,ज्ञानेश्वर करपे,शिरीष मुळे,भारत गवळी,वैभव लांडगे,निलम खताळ,कांचन ढोरे,सुरेखा खरे,अंजना भालसिंग,रुपाली उंडे,दिपाली वाव्हळ,दिलीप रावळ,पांडू शेराल,रवी उडता,रोहित चौधरी,वरद बागुल,भगवान गीते,शशांक नामन,विनायक तांबे,संदेश देशमुख,अक्षय वरपे,भैय्या सातपुते,कल्पेश पोगुल,सुदर्शन इटप,विशाल एनगंदूल,शिवाजी घोडेकर,प्रवीण करपे,जग्गु शिंदे,विकास जाधव यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी शहर पोलीस ठाण्याचे निरीक्षक रवींद्र देशमुख यांना निवेदन देण्यात आले.

**संतप्त वातावरणातही गोवंशाची कत्तल सुरुच!**

असून त्याला अटकही करण्यात आली आहे.

याबाबत शहर पोलिसांकडून समजलेल्या माहितीनुसार पोलीस निरीक्षक रवींद्र देशमुख यांना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे सदरची कारवाई करण्यात आली. त्यानुसार भारतनगरमधील कादरी मशिदीच्या पाठीमागील बाजूच्या गल्लीत गोवंशाची मोठ्या प्रमाणात कत्तल होत असल्याचे समोर आल्यानंतर आज (ता.२३) पहाटे पाचच्या सुमारास पोलिसांनी सदर ठिकाणी छापा घातला. यावेळी गल्लीच्या आडोशाला एका वाड्यात रात्रभर शेकड्याने गोवंश जनावरांची कत्तल करुन मोठ्या प्रमाणात त्यांचे मांस जमा करुन ठेवल्याचे पोलीस पथकाला दिसले. या कारवाईवेळी नेहमीप्रमाणे कत्तलखान्याचा चालक मात्र पसार झालेला होता. त्यामुळे पोलिसांनी घटनास्थळावरुन १९ वर्षीय अदनान इक्बाल कुरेशी (रा.भारतनगर) या कसायाला ताब्यात घेतले.

या प्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल रोहीदास शिरसाठ यांच्या तक्रारीवरुन त्याच्यावर भारतीय न्यायसंहितेच्या कलम २७१, ३२५ सह महाराष्ट्र प्राणी संरक्षण कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपीला अटक करण्यात आली आहे. या कारवाईत पोलिसांना तीन लाख ६० हजार रुपये बाजारमूल्य असलेले एक हजार २०० किलो गोवंशाचे मांस आढळून आले असून ते जप्त करुन त्याची विल्हेवाट लावण्यात आली आहे. पोलिसांनी केलेल्या कारवाईत मोठ्या प्रमाणात गोवंशाचे मांस आढळल्याने शहरातील कत्तलखाने बंद असल्याचा पोलिसांचाही दावाही खोटा असल्याचे सिद्ध झाले आहे.

मंगळवारी (ता.२२) पर्यटनासाठी काश्मिर खोऱ्यात गेलेल्या देशभरातील विविध ठिकाणच्या पर्यटकांना पहेलगाम जवळील घनदाट जंगल परिसरात लक्ष्य करीत दहशतवाद्यांनी २८ जणांचा जीव घेतला. धक्कादायक म्हणजे आपल्या कुटुंबियांसमवेत पर्यटनाला गेलेल्या या सर्वांची दहशतवाद्यांनी आधी ओळख पटवली व त्यानंतर निवडून निवडून त्यातील केवळ पुरुषांची गोळ्या घालून निर्घून हत्या केली. या भयानक घटनेची वार्ता देशभर पसरल्यानंतर प्रत्येक भारतीयाच्या मनात पाकिस्तान पुरस्कृत दहशवाद्यांबाबत प्रचंड संताप खदखदत असतानाच संगमनेरात गोवंशाच्या कत्तलीचा मोठा प्रकार समोर आल्याने स्थानिक नागरिकांच्या संतापात मोठी भर पडली आहे.

राज्यात ऐतिहासिक बहुमत मिळवण्यासह महायुतीने यंदा संगमनेरातही परिवर्तन घडवले. त्यामुळे शहराला कलंक असलेले येथील बेकायदा कत्तलखाने आता कायमस्वरुपी बंद होतील अशी सर्वसामान्यांना अपेक्षा होती. पोलिसांकडूनही कत्तलखान्यांसह शहरातील अन्य अवैध व्यवसाय बंद असल्याचे चित्र निर्माण केले गेले होते. मात्र या कारवाईने ते पूर्णतः फोल असल्याचेही आता स्पष्ट झाले आहे. त्यातून येथील कसायांवर पोलिसांचा कोणताही धाक राहीला नसल्याचेही पुन्हा एकवार ठळकपणे दिसून आले आहे.

**पशुधन विकास अधिकाऱ्यावर पंचायत समितीत हल्ला!**

मनी (खंडणी) द्यावा लागेल. त्यावेळी फिर्यादीने त्यास स्पष्ट नकार दिला. मी पहिल्या पासुन शेवगाव येथे राहण्यास आहे. त्यामुळे मी प्रोटक्सन मनी देवु शकत नाही. त्यानंतर मंगळवार दि.२२ एप्रिल रोजी सांयकाळी ५.१५ वाजेच्या सुमारास फिर्यादी त्यांच्या ऑफिस मध्ये असतांना अनिस सय्यद (रा.नाईकवाडी मोहल्ला शेवगाव ता. शेवगाव) व त्याच्या सोबत दोन अनोळखी इसम (नाव, गाव महित नाही) असे ऑफिस मध्ये येवुन फिर्यादी डॉ. जाधव यांना म्हणाले की, तुला सांगितलेले पैसे तु का दिले नाही? असे म्हणून शिवीगाळ करुन कोणत्यातरी धारदार वस्तुने चेहऱ्यावर मारहाण करुन फिर्यादीच्या खिशातून ५ हजार रुपये रोख रक्कम, गळ्यातील एक तोळ्याची सोन्याची चैन बळजबरीने काढून घेवुन दहशत निर्माण करून शिवीगाळ करून निघुन गेले. त्यानंतर फिर्यादी आणि ऑफीस मध्ये असलेल्या इतर कर्मचाऱ्यांनी त्यास हाक मारुन माझे पैसे व सोन्याची चैन वापस दे असे म्हणालो असता तो मला म्हणाला की तुला काय करायचे ते कर, मी तुला भित नाही असे म्हणून तो निघून गेला.

**कारखान्यावर सभासद व जनतेचा मोठा विश्वास : माजी मंत्री थोरात**

जनतेचा मोठा विश्वास असल्याचे गौरवोद्गार काँग्रेसचे ज्येष्ठ नेते तथा राज्याचे माजी मंत्री लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी काढले.

तालुक्यातील गुंजाळवाडी येथील कृष्णा लॉन्स व समनापुर येथे झालेल्या कारखाना सभासद, शेतकरी व युवकांच्या स्नेहसंवाद मेळाव्यात ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर माजी आ.डॉ. सुधीर तांबे, बाबा ओहोळ, लहानुभाऊ गुंजाळ, आर.बी. राहणे, इंद्रजीत थोरात, बाळासाहेब ढोले, सिताराम राऊत, लक्ष्मण कुटे, संतोष हासे, नवनाथ आरगडे, संपतराव गोडगे, रामनाथ कुटे, योगेश भालेराव, लता गायकर, निर्मला गुंजाळ, अंकुश ताजणे, सरपंच नरेंद्र गुंजाळ, रामनाथ कु-हे, भास्कर शरमाळे आदी उपस्थित होते.

यावेळी बोलताना लोकनेते बाळासाहेब थोरात म्हणाले की, सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात यांच्या आदर्श तत्त्वावर संगमनेरचा सहकार व कारखान्याचा कारभार सुरू आहे. चांगला कारभार व व्यवस्थापनामुळे सर्व शेतकरी सभासद व जनतेचा कारखान्यावर मोठा विश्वास आहे.विधानसभेच्या पार्श्वभूमीवर कारखान्याच्या निवडणुकीबाबत मोठी चर्चा होती. मात्र तालुक्यातील जनतेचा, सभासदांचा शेतकरी विकास मंडळावर मोठा विश्वास होता. मोठ्या मताधिक्याने नक्कीच विजय होता. सहकार जपला पाहिजे ही सर्वांची भावना होती. आपण कायम तालुक्याच्या विकासासाठी काम केले. कधीही भेदभाव केला नाही. मोठ्या संघर्षातून तालुक्याला हक्काचे पाणी मिळवले. सातत्याने विकास कामे केली. निळवंडे धरण व कालव्यांची कामे पूर्ण केली. आज कालव्यांमधून पाणी येते आहे. यामध्ये कष्ट आहेत. जेथे टँकर होते तेथे आज पाणी आहे. कोणतेही काम सहजासहजी होत नाही. सर्वांना सोबत घेऊन राजकारणाची पद्धत, सुसंस्कृत राजकारण ही आपली वेगळी परंपरा आहे. आपण कामात कुठेही कमी नाही. आणि त्यामुळे विधानसभा निवडणुकीचा निकाल हा सर्वांना अविश्वसनीय आहे.

मोठ्या संघर्षातून तालुक्याला पाणी मिळवले आहे. आता संगमनेर तालुक्याला कालव्यांमधून हक्काचे पाणी देण्यासाठी पहिले पाईप टाकले पाहिजे आणि त्यानंतर काँक्रिटीकरण झाले पाहिजे अशी मागणी करतांना कालव्याच्या खालील बाजूस व वरच्या बाजूस पाणी देण्याचे आपण नियोजन केले होते. हे पाणी मिळालेच पाहिजे. सहकारी संस्था या सर्वांच्या जिवाभावाचा विषय आहे.येथे अनेक जण इच्छुक होते परंतु अनेकांनी माघार घेतल्याने संचालक मंडळाची निवडणूक बिनविरोध होते याचा आनंद आहे मात्र पुढील काळात एकरी ऊस उत्पादन वाढीसाठी काम करावे लागणार आहे. यामध्ये ए आयचा वापर करावा लागणार असल्याचे ते म्हणाले.

डॉ.तांबे म्हणाले की, लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वावर तालुक्यातील जनतेचा कायम विश्वास आहे. संगमनेरचा सहकार हा राज्यात प्रथम क्रमांकाचा आहे. सहकार हे राजकारणाचे ठिकाण नाही. सहकाराचे पावित्र्य सर्वांनी जपले पाहिजे. सध्या निवडणुकांमध्ये द्वेष भावना पसरवली जात आहे. चुकीच्या पद्धतीचा वापर केला जात आहे.यामुळे देशाचे भवितव्य अंधकारमय झाले असून आगामी सर्व निवडणुका कार्यकर्त्यांनी एकजुटीने लढवताना सर्वसामान्य जनतेपर्यंत अधिक संपर्क वाढवा असे आवाहन त्यांनी केले. यावेळी तालुक्यातील शेतकरी, सभासद, युवक व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## डॉ.सौरभ गिते एम.डी. आयुर्वेद उत्तीर्ण

**नायक वृत्तसेवा, अकोले**

येथील हिंद सेवा मंडळ संचलित मॉर्डर्न हायस्कूलचे सेवानिवृत्त शिक्षक अॅड.श्रीकृष्ण गीते यांचे चिरंजीव डॉ. सौरभ श्रीकृष्ण गिते यांनी महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक येथून एम.डी (आयुर्वेद) ही पदव्युत्तर परीक्षा यशस्वीरीत्या उत्तीर्ण केली.

डॉ.सौरभ गिते हे अॅड. श्रीकृष्ण चांगदेव गिते यांचे चिरंजीव तर डॉ. सुशांत श्रीकृष्ण गिते यांचे बंधू आहेत. त्यांनी आपले बीएएमएस आणि एम.डी. चे शिक्षण यशवंत आयुर्वेद महाविद्यालय, कोडोली (कोल्हापूर) येथून पूर्ण केले आहे. शालेय शिक्षण दिगंबर गणेश सराफ विद्यालय, संगमनेर आणि महाविद्यालयीन शिक्षण सह्याद्री ज्युनियर कॉलेज, संगमनेर येथे झाले.

त्यांच्या यशाबद्दल अॅड.श्रीकृष्ण गिते, माणिक गिते, डॉ. मयुरी सौरभ गिते, डॉ. सुशांत गिते, डॉ. सोनाली सुशांत गिते, डॉ. विष्णुपंत भंडारे, डॉ. स्मिता भंडारे, उदयकुमार खैरनार, मोहिनी खैरनार, डॉ. निलेश सातपुते, डॉ. अमोल वालझाडे,



डॉ. विकास करंजेकर, डॉ. सोमनाथ मुटकुळे, डॉ. विनायक नागरे, डॉ. शरद गुंजाळ, डॉ. संदीप वामन,अनिल वैद्य यांचेसह विविध क्षेत्रातील मान्यवरांनी अभिनंदन केले आहे. डॉ.सौरभ गिते आणि डॉ.मयुरी सौरभ गिते हे संगमनेर येथे कार्यरत असून, त्यांनी स्थानिक नागरिकांसाठी उत्तम वैद्यकीय सेवा देण्याचा वसा घेतला आहे.

## चिमुकल्यांनी केली रेंगे गार्डनची सफर!

**नायक वृत्तसेवा, संगमनेर**

येथील कै.शंकरराव शेवाळे पाटील ट्रस्ट संचलित जिजामाता इंग्लिश मीडियम स्कूल मध्ये रविवार दि.२० एप्रिल रोजी उन्हाळी बालसंस्कार शिबिराचा सहावा दिवस होता. या शिबिरात चिमुकल्या विद्यार्थ्यांनी रेंगे गार्डनची सफर करत आनंद लुटला.

शिबिराची सुरुवात निसर्गरम्य वातावरणात झाली. मुलांचे कौशल्य विकसित होण्यासाठी प्रथम संस्कृत श्लोक, जिजाऊ वंदना, छत्रपती शिवाजी महाराजांचा ध्येयमंत्र, योगासने मुलांकडून करून घेण्यात आले.



त्यासोबतच छान- छान गोष्टी देखील मुलांना सांगितल्या. उन्हाळी बालसंस्कार शिबिरा अंतर्गत रेगे गार्डनची सफर करून विविध खेळांचा भरभरून आनंद मुलांनी घेतला. तसेच इंडोर गेम, नृत्य आणि संगीत खुर्ची अशा विविध उपक्रमांमध्ये मुलांनी सहभाग नोंदविला. यानंतर मुलांनी सकस व पौष्टिक आहार घेतला.

## प्रा.चंद्रशेखर हासे शिक्षक भारतीच्या जिल्हा संघटकपदी

**नायक वृत्तसेवा, अकोले**

पुणे येथील साने गुरुजी स्मारक येथे शिक्षक भारतीच्या राज्य कार्यकारणी बैठकीत तालुक्यातील ब्राह्मणवाडा येथील सह्याद्री माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील इंग्रजी विषयाचे प्रा. चंद्रशेखर हासे यांची अहिल्यानगर जिल्हा संघटक पदी निवड करण्यात आली. महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष अशोक बेलसरे, कार्याध्यक्ष सुभाष मोरे, प्रमुख कार्यवाह संजय वेतुरेकर



यांच्या सहीचे नियुक्तीपत्र हासे यांना देण्यात आले. शिक्षक भारती संघटना ही धर्मनिरपेक्ष, लोकशाही, समतावादी आणि विज्ञाननिष्ठ समाज निर्मितीसाठी कार्य करणारी संघटना आहे. यावेळी ज्युनिअर कॉलेज युनिट महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष जी.टी. पाटील, उपाध्यक्ष राजेंद्र झाडे, धनाजी पाटील, पुणे विभागीय कार्याध्यक्ष महेश पाडेकर,सुनील गाडगे, विनाअनुदान विरोधी कृती समितीच्या महिला अध्यक्षा रूपाली कुरुमकर, जिल्हाध्यक्ष रामराव काळे, आप्पासाहेब जगताप, दादासाहेब जगताप, राजीव शिरसठ, विविध जिल्ह्यातील जिल्हाध्यक्ष, पदाधिकारी यांनी संघटनेच्या वतीने प्रा. हासे यांचे अभिनंदन केले.

नायक ANCHOR

## इंडियन टॅलेंट ओलंपियाड मध्ये 'आत्मा मालिक' चा दबदबा

**नायक वृत्तसेवा, कोपरगाव**

इंडियन टॅलेंट ओलंपियाड तर्फे देशपातळीवर गणित, विज्ञान, इंग्रजी, कला, संगणक इंडियन टॅलेंट ओलंपियाड परीक्षा घेण्यात येते. नुकताच या परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून या परीक्षेत आत्मा मालिक सेमी इंग्लिश मिडीयम गुरूकुल हे पुन्हा अव्वल स्थानी आले आहे. गुरूकुलचे ७ विद्यार्थी राज्य गुणवत्ता यादीत चमकले.१३ विद्यार्थ्यांना एक्सलन्स अवॉर्ड, ३९ विद्यार्थी गोल्ड मेडल अवॉर्ड, २६ विद्यार्थी सिल्वर मेडल अवॉर्ड, २४ विद्यार्थ्यांना ब्रेझ मेडल प्राप्त झाल्याची माहिती प्राचार्य निरंजन डांगे यांनी दिली.



यामध्ये गणित ओलंपियाड मध्ये शिवराज पाटिल राज्यात चौथा, श्रीजीत इंगोले राज्यात पाचवा,शुभम जाधव राज्यात सहावा, सायन्स ओलंपियाड मध्ये दुर्गेश धनवटे राज्यात पाचवा,कला ओलंपियाड मध्ये सिद्धांत जाजू राज्यात तिसरा, समर्थ खेडकर राज्यात चौथा, हार्दिक बर्वे राज्यात पाचवा यांनी यश मिळविले. आत्मा मालिक पॅटर्नचे हे यश आहे. याअंतर्गत अभ्यासक्रमाचे सुक्ष्म नियोजन, तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर, तयारी शिबीराचे आयोजन, नैदानिक चाचण्या, सराव परीक्षा, तज्ञांचे मार्गदर्शन विद्यार्थी व शिक्षकांचे परीश्रम यामुळे हे यश साकारले असे मत संस्थेचे अध्यक्ष नंदकुमार सुर्यवंशी यांनी व्यक्त केले. विदयार्थ्यांना प्राचार्य निरंजन डांगे विभाग प्रमुख अनिल सोनवणे, सचिन डांगे, पयवेक्षक नयना शेटे, गणेश रासने, विषय शिक्षक अमोल कर्डिले, गुरुराज सज्जन, मोरेश्वर गायकवाड, प्रसाद करडे, अनिता वाणी, रुपाली होन अथर्व फाऊंडेशनचे शिवम तिवारी, शिक्षक रोहिणी होन, अनुशिखा आस्ताना, प्रियांशू कुमार, हरीश साठे यांचे मार्गदर्शन लाभले.यशस्वी विद्यार्थ्यांचे अध्यक्ष नंदकुमार सुर्यवंशी, उपाध्यक्ष बाळासाहेब गोर्डे,सरचिटणीस हनुमंत भोगळे, कोषाध्यक्ष विठठल होन, विश्वस्त प्रकाश गिरमे, प्रदिपकुमार भंडारी, शालेय व्यवस्थापक सुधाकर मलिक वसतिगृह व्यवस्थापक साईनाथ वर्पे आदींनी अभिनंदन केले.


पाहिजेत 9850545333

एम. जी. काजळे ज्वेलर्ससाठी तात्काळ पाहिजेत

सेल्समन - 4 जागा (स्त्री/पुरुष)

कॉम्प्युअर ऑपरेटर - 2 जागा

पगार - 15000 ते 20000व इतर सवलती

पत्ता- एम. जी. काजळे ज्वेलर्स, जाणता राजा रोड, संगमनेर



SR THORAT DAIRY | पाहिजेत | GAGANGIRI PACKAGED PURITY

| अ.क्र | पदाचे नाव | जागा | शैक्षणीक पात्रता / अनुभव |
|---|---|---|---|
| १. | सेक्युरिटी गार्ड | ५ | अनुभव किमान ५ वर्षे. (Ex-Servicemen preferred) |
| २. | ईटीपी ऑपरेटर | २ | शिक्षण १२वी व पदवीधर अनुभव किमान ४ वर्ष, पुरुष, वय मर्यादा ३० वर्ष |
| ३. | बॉयलर फायरमन | २ | शिक्षण १२वी अनुभव किमान २ वर्ष, पुरुष, वय मर्यादा ३० वर्ष |
| ४. | 1st क्लास बॉयलर ऑपरेटर | २ | अनुभव किमान ५ वर्षे, पुरुष, वय मर्यादा ३० वर्ष |
| ५. | कामगार (पुरुष) | १० | शिक्षण १२वी वय मर्यादा ३० वर्ष |

समक्ष भेटणे – एच.आर. विभागास मुळ कागदपत्रासह रविवार सोडून.
ऑफिस – एस.आर. थोरात मिल्क प्रोडक्टस प्रा.लि. राजापूर रोड संगमनेर

मोबा. 9860100936/937
E-Mail Id: admin@srthoratmilk.com / hr@srthoratmilk.com



MALPANI

卐 अक्षयतृतीयेच्या शुभमुहूर्तावर 卐

मालपाणी उद्योग समूह आयोजित

भव्य सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळा!

बुधवार, दि. 30 एप्रिल २०२५, सायं.४ वाजता | ठिकाण - मालपाणी लॉन्स, कॉलेज रोड, संगमनेर

- प्रत्येक नवविवाहित दाम्पत्याला स्टील कपाट, दिवाण-गादी व संसारोपयोगी साहित्य भेट!
- वरासाठी ड्रेस, फेटा/उपरणे व वधुसाठी साडी
- सर्वांसाठी भोजन व्यवस्था

सर्वधर्मीयांसाठी खुला व मोफत विवाह सोहळा

नोंदणीसाठी कायद्यानुसार वधूचे वय १८ वर्षे व वराचे वय २१ वर्षे असणे बंधनकारक

विवाह नोंदणी सुरु झाली आहे, त्वरित संपर्क करावा...प्रवेश मर्यादित!

संपर्क : एच.आर. विभाग, मालपाणी इंडस्ट्रीयल पार्क, अकोले रोड, संगमनेर

श्री. राहुल शेरमाळे (9960 253 607) | श्री. रविंद्र कानडे (9850 890 618)


'बांधिलकी जनहिताची नायक' हे दैनिक मालक, मुद्रक व प्रकाशक घनश्याम हनुमानप्रसाद तिवाडी यांनी विकास प्रिंटींग अॅण्ड कॅरिअर्स प्रा.लि., प्लॉट नं. ३२, एम.आय.डी.सी. सातपूर, नाशिक येथे छापून ऐश्वर्या कॉम्प्लेक्स, तळमजला, गाळा क्रमांक बी-१०, बस स्टँडजवळ, संगमनेर, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर – ४२२ ६०५ येथे प्रसिद्ध केले. संपादक : गोरक्षनाथ भिमाजी मदने, कार्यकारी संपादक : श्याम तिवारी.

## पाहिजेत

धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल

| अ.नं | पद | जागा |
| --- | --- | --- |
| १ | R.M.O | २ |
| २ | Bsc Nursing Staff Clinical | २ |
| ३ | Driver Plus Receptionist | ३ |

पत्ता: ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ. नगर
मो. ७४९९१७६८६४, ९४२०८५४३०६
फोन:०२४२५-२२७५७५/२२७५७४



बांधिलकी जनहिताची
# नायक
MAHMAR/2018/75654 | SRP/135/2022-2024



जिथे काळजी आणि उपचार एकत्र येतात...
ताम्हाणे हॉस्पिटल
इंदिरानगर, गल्ली नं. १०, संगमनेर
डॉ. विशाल ताम्हाणे (एम.एस.-शल्य) कन्सल्टंट जनरल अॅण्ड लेझर सर्जन
डॉ. रुपाली विशाल ताम्हाणे (बी.ए.एम.एस.) स्त्रीरोग / प्रसुती चिकीत्सक
Help Line : 7219 100 100
मेडिसिन ▪ सर्जरी ▪ लेझर सेंटर ▪ स्त्रीरोग-प्रसुति ▪ मुळव्याध-भगंदर-फिशर





शेरवानी शानदार.. रुबाब दिमाखदार..
लग्न म्हणजे बस्ता. बस्ता म्हणजे राजेन्द्र.
१९५९ पासून विश्वासाची सार्थ परंपरा... राजेन्द्र
मेन रोड, संगमनेर. फोन : 02425-225740, 7901031155


# निळवंडे उच्चस्तरीय कालव्यातून दुष्काळी गावांना पाणी!



## शेतकऱ्यांनी मानले जलसंपदा मंत्र्यांचे आभार

**नायक वृत्तसेवा, अकोले**

निळवंडेची उपसा यंत्रणा कार्यान्वित झाल्यामुळे धरणातील पाणीपातळी मोठ्या प्रमाणात कमी झाली असतानाही उच्चस्तरीय पाईप कालव्यातून पाणी वाहू लागले आहे. कडक उन्हाळ्यात तालुक्यातील कळस गावच्या बंधाऱ्यात निळवंडेचे पाणी पोहोचले. उन्हाळ्यात आलेल्या पाण्यामुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला असून विहिरींच्या पाणी पातळीतही वाढ होऊ लागल्याने जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे शेतकऱ्यांनी आभार मानले आहे. तसेच स्व.मधुकर पिचड यांनी पाहिलेले स्वप्न पूर्ण झाल्याची भावना ग्रामस्थातून व्यक्त होत आहे.

संगमनेर येथे दोन दिवसापूर्वी जलसंपदा विभागाची बैठक मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली व आमदार डॉ. किरण लहामटे, आमदार अमोल खताळ, माजी आमदार वैभव पिचड, जिल्हा परिषद अर्थ व बांधकाम समितीचे माजी सभापती कैलास वाकचौरे यांच्या उपस्थितीत पार पडली. यावेळी अनेक शेतकऱ्यांनी प्रश्न उपस्थित केले. उच्चस्तरीय कालव्याचे पाणी कळस गावाला आत्तापर्यंत आले नव्हते असे ग्रामस्थांनी मंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिले असता मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी सकारात्मक प्रतिसाद देत तातडीने कार्यवाही केल्याने हे पाणी कळसला पोहचले.

माजी मंत्री जलनायक मधुकर पिचड यांच्या संकल्पनेतून फक्त अकोले तालुक्यासाठी असणाऱ्या निळवंडे धरणाच्या उच्चस्तरीय पाईप कालव्यांचा लाभ तालुक्यातील २ हजार ३२८ हेक्टर क्षेत्रास होतो. डाव्या उच्चस्तरीय कालव्याची लांबी २०.६८ कि.मी., त्याचे लाभक्षेत्र ८७१ हेक्टर तर उजव्या उच्चस्तरीय कालव्याची लांबी १९.३७ कि.मी. व लाभक्षेत्र १ हजार ४५७ हेक्टर आहे. उच्चस्तरीय पाईप कालवे तलांक ६२७.४० मीटरवरून सुरू होतात. निळवंडे जलाशयाची पूर्ण संचय पातळी तलांक ६४८.१५ मी. आहे. उच्च स्तरीय पाईप कालवा हा तलांक ६३० मी ते ६४८ मी. या गुरुत्वीय दबावाने संकल्पित करण्यात आलेला आहे. म्हणजेच धरणातील पाणीपातळी जेव्हा तलांक ६३० मी. ते ६४८.१५ मी. दरम्यान असते, तेव्हाच या उच्चस्तरीय पाईप कालव्यातून पाणी देता येते. पाणीपातळी तलांक ६३० मी. पेक्षा कमी झाली की धरणात पाणी असूनही या कालव्याद्वारे पाणी देता येत नव्हते. उच्चस्तरीय कालवे प्रणालीकरिता उपसा यंत्रणेची उभारणी करण्यात आली आहे. पंपांद्वारे हा पाणी उपसा ५५० मिमी आकाराच्या पाईपद्वारे वितरण कुंडात जमा होते. या ठिकाणी पाणीपातळी तलांक ६४२ मी. ठेवली जाते. यामुळे उच्चस्तरीय कालव्यातून बाराही महिने पाणी पुरवठा करता येणार

- उच्च स्तरीय कालवे झाल्या पासून कळसला पाणी आले नव्हते, मात्र संगमनेरच्या बैठकीत मुद्दा उपस्थित करताच जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी झाली. माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांनी विशेष सहकार्य केले आहे. कैलास वाकचौरे यांनीही प्रयत्न केल्याचे कळस चे माजी सरपंच भाऊसाहेब वाकचौरे यांनी सांगितले.


श्री कळसेश्वर महाराज श्री गणेशाय नमः श्री संत सेना महाराज
#1 CUT'S Hair & Beauty Studio
ONE CUT WIG CENTRE
काही मिनिटातच तारुण्य अवस्थेतील केस परत मिळवा..
टक्कल पडलेय नो टेन्शन त्यावर आहे आता नवीन ऑप्शन
Before After
ऑपरेशन विना तारुण्यावस्थेतील केस परत मिळवा
₹ 10,000 ₹ 6,999/-
पत्ता - अभंग पेट्रोल पंपासमोर, पेटीट हायस्कुल अकोले रोड, संगमनेर
मो. 9511233837 / 9142255255





नायक ANCHOR

# पालिकेकडून दिव्यांगांची हेळसांड!

## दिव्यांग भवनासाठी भीक मागो आंदोलन : लहामगे

**नायक वृत्तसेवा, संगमनेर**



दिव्यांग संघटनेने वारंवार पत्र व्यवहार करूनही संगमनेर नगर परिषदेने दिव्यांग बांधवांच्या प्रश्नांची कुठलीही दखल घेतली नाही. त्यामुळे दिव्यांगांची हेळसांड होत आहे. दिव्यांग भवनाचाही प्रश्न प्रलंबित आहे. यामुळे संतप्त झालेल्या दिव्यांग बांधवांनी दिव्यांग भवनासाठी भीक मागण्याचा संकल्प केला आहे. यासाठी त्यांनी नगरपालिका प्रशासनाकडे परवानगी मागितली आहे. शुक्रवार दि.२५ एप्रिल पर्यंत आम्ही परवानगीची वाट पाहू. नगरपालिकेने परवानगी दिली नाही तर नगरपालिकेकडून परवानगी मिळाली असे समजून भीक मागण्यास सुरुवात करू असा इशारा शिवसेना (उबाठा)दिव्यांग सहाय्य सेनेचे जिल्हाप्रमुख जालिंदर लहामगे यांनी दिला आहे. याबाबत येथील दिव्यांग शिवशक्ती बहुउद्देश संस्था व शिवसेना दिव्यांग सहाय्यसेना यांच्या वतीने संगमनेर नगर पालिकेच्या मुख्याधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले आहे. या निवेदनात त्यांनी म्हटले आहे की,२०१६ ते २०२४ पर्यंत दिव्यांगांची निधीबाबत हेळसांड करून फसवणूक करून दिव्यांगांना निधीपासून वंचित ठेवण्यात आले आहे. दिव्यांग आयुक्त पुणे यांनाही फसवी माहिती देऊन फसवण्यात आले. एका वर्षात ३ वेळा निधी काढण्यात आला. त्यापैकी ५,४२,००० रुपयांचा निधी देण्यात आला. उर्वरित ७ लाख रुपये कुठे खर्च करण्यात आले तसेच पेज नंबर दोन वरून वार्षिक एकूण महसूल उत्पन्न, बांधील खर्च, दिव्यांगा करता राखीव निधी, न. पा. द्वारे खर्च अशाप्रकारे चार्ट बनवण्यात आला. त्यामध्ये १६ ते १७ मध्ये ३ लाख रुपये दर्शवण्यात आले ते कुठे खर्च करण्यात आले. १८ ते १९ मध्ये १५ लक्ष रुपये दर्शविण्यात आले, त्यापैकी ८२८००० उर्वरित रक्कम कुठे खर्च करण्यात आली तसेच २० ते २१ मध्ये ७ लक्ष रुपये दर्शविण्यात आली व २०२१ त्यामध्ये ३०००० हजार रुपये खर्च करण्यात आला. उर्वरित रक्कम कुठे खर्च करण्यात आली याची माहिती उपलब्ध होऊ शकत नाही. १६ ते २४ दिव्यांग निधीतून उर्वरित रक्कम किती शिल्लक राहिली आहे, ती रक्कम कुठे खर्च करण्यात आली तसेच दिव्यांगांना बँक खातेत जमा केलेल्या प्रत्येकाच्या रकमेचे छायांकीत प्रत देण्यात यावी, दिव्यांग शिवशक्ती बहुउद्देश सेवाभावी संस्थेकडून दिव्यांग भवनासाठी १५/०२/२०२३ चे पत्राचा छायांकित प्रत मिळावी अशी मागणी या निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

- शासनाच्या आदेशाचे पालन संगमनेर नगरपालिका कार्यालय करत नसल्यामुळे दिव्यांगांची हेळसांड करून त्यांना कमी लेखले जाते की काय असे निदर्शनात येत आहे. आतापर्यंत दिव्यांगांचा राखीव निधी पूर्णपणे वाटण्यात आलेला नाही असे या निवेदनात म्हटले आहे. निवेदनाच्या प्रती मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, पालकमंत्री, जिल्हाधिकारी, आमदार आदींना पाठविण्यात आल्या आहेत.


अर्थ, आरोग्य, अध्यात्म! 28 वर्षांची विश्वासाई परंपरा!
MUTUAL FUNDS Sahi Hai
गुंतवणुकीची प्रत्येक स्टेप तुमच्या आर्थिक स्वप्नपूर्तीकडे
SYSTEMATIC INVESTMENT PLAN IN EQUITY MUTUAL FUNDS
✓ म्युच्युअल फंड्स ✓ एस.आय.पी. ✓ पी.एम.एस. ✓ एन.पी.एस. ✓ सिस्टीमॅटीक विड्रॉल प्लॅन ✓ सिस्टीमॅटीक ट्रान्सफर प्लॅन ✓ टर्म लाईफ इन्शुरन्स ✓ मेडीक्लेम
AMFI Certified म्युच्युअल फंड वितरक
KADLAG INVESTMENT
...Dreams make sense...
HELP LINE : 91503 06306 | 91425 59000
एस.- 5, दुसरा मजला, टॉप टेन इम्पिरीअल, यशोधन समोर, संगमनेर



✻ स्वर्गवास ✻
दिनांक. १५/०४/२०२५
त्या हसऱ्या चेहऱ्याने नाही, कोणाला दुखावले, मनाचा तो भोळेपणा,
कधी नाही केला मोठेपणा, उडुनी गेला अचानक प्राण, पुनर्जन्म घ्यावा हीच आमची प्रार्थना...



कै.चांगदेव तुकाराम दिघे
सी.टी. दिघे, (गव्हर्मेंट कॉन्ट्रॅक्टर)
यांना
भावपूर्ण श्रद्धांजली !
- दशक्रियाविधी -
गुरुवार दि. 24/04/2025 रोजी सकाळी 8.30 वा. होईल
ठिकाण - दिघे वस्ती, संगमनेर खुर्द, ता.संगमनेर, जि.अहिल्यानगर
शोकाकुल
गं.भा.सुरेखा चांगदेव दिघे (पत्नी)
श्री.नामदेव तुकाराम दिघे (भाऊ) — श्री.भागवत तुकाराम दिघे (भाऊ)
गं.भा.चहाबाई संपतराव हासे (बहिण) — गं.भा.सुरेखा एकनाथ राहणे (बहिण)
गं.भा.हिराबाई साहेबराव हासे (बहिण) — सौ.घबुताई रामदास बेंद्रे (बहिण)
श्री.गणेश चांगदेव दिघे (मुलगा) — सौ.अश्विनी गणेश दिघे (सुन)
सौ.सविता सुधीर खांदे (मुलगी) — सौ.अर्चना दिनेश कानवडे (मुलगी)
सौ.शारदा संदिप राहणे (मुलगी) — कु.अन्वी गणेश दिघे (नात)
चि.राजवीर गणेश दिघे (नातु)
समस्त दिघे पाटील परिवार व आप्तेष्ट
प्रवचन सेवा - ह.भ.प. कल्याण महाराज पवार व एस.झेड. देशमुख सर यांचे प्रवचन होईल



स्वास्थ्य रक्षणाय् रोग परिशमनाय् KH
कुटे हॉस्पिटल अॅण्ड लॅप्रोस्कोपी सेंटर
४० फुटी डी. पी. रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
फोन : (०२४२५) २२६६८८, २२६६८६
डॉ.सोनाली प्र. कुटे (M.B.B.S., D.A.) Physician & Anaesthetists Reg.No. 2005/093398
डॉ.प्रदीप भा. कुटे (M.S., Shalya) Laproscopic Surge & Endoscopist Reg.No. I-45801-A
● मॉड्युलर ऑपरेशन थिएटर ● एसी/डिलक्स रुम्स् ● महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना उपलब्ध ● तज्ज्ञ डॉक्टर्स व प्रशिक्षित स्टाफ ● डायलेसिस विभाग ● इन्टरकॉम, टीव्ही ● ९ बेडस्‌चा सुसज्ज आय.सी.यु. विभाग व सुसज्ज अपघात विभाग ● नर्स कॉल बेल सिस्टिम ● गरम पाण्यासाठी सोलर ● सेंट्रल ऑक्सिजन व सक्शन ● सर्व प्रकारच्या शस्त्रक्रिया ● सर्व प्रकारचे मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा उपलब्ध ● अत्याधुनिक सुविधा ● ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा ८८८ ८८८ २२२५